# चोरीचे सोने विक्री करण्यासाठी आलेल्या पंजाबच्या दोघांच्या मुसक्या इतवारा पोलिसांनी आवळल्या

## नांदेड रेल्वे स्थानकावरुन चोरली होती सोन्याची चैन

देशोन्नती दि 10/05/2023



देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ■ येथील रेल्वे स्थानकावर चोरलेली सोन्याची चैन सराफा बाजारात विक्री करण्यासाठी घेवून जात असलेल्या पंजाबच्या दोन चोरट्यांच्या मुसक्या इतवारा ठाण्याच्या डीबी पथकाने आवळल्या असून चोरट्यांकडून १ लाख १६ हजार ७५४ रुपये किंमतीची सोन्याची चैन जप्त केली.

नांदेडच्या रेल्वे स्थानकावरुन ३ मे रोजी चोरट्यांनी सोन्याची चैन चोरली होती. याप्रकरणी लोहमार्ग पोलिसांनी गुन्हा दाखल केलेला आहे. दरम्यान यातील चोरटे चोरलेली सोन्याची चैन विक्री करण्यासाठी सराफा बाजारात आल्याची गुप्त माहिती इतवारा पोलिसांनी मिळाली. उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ.सिध्देश्वर भोरे व पोलिस निरीक्षक ज्ञानोबा देवकत्ते यांच्या मार्गदर्शनाखाली ८ मे रोजी डीबी पथक पेट्रोलिंग करीत असतांना सोन्याची चैन विक्री करण्यासाठी आलेले पंजाबचे सुखविंदरसिंग उर्फ सोनु लंबेरसिंग व अर्जितसिंग सरदूर सिकंदर हे दोघे पथकाच्या तावडीत सापडले. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेवून अंगझडती घेतली असता संशयीत इसम सुखविंदरसिंग उर्फ सोनुकडे १ लाख १६ हजार ७५४ रुपये किंमतीची २१.२५० ग्रॅम सोन्याची चैन आढळून आली. त्यांची अधिक चौकशी केली असता त्यांनी सदर चैन रेल्वे स्थानकावरुन चोरल्याची कबुली दिली. याबाबत लोहमार्गचे पोनि सुरेश उनवणे यांच्याशी इतवारा पोलिसांनी संपर्क साधून लोहमार्ग पोलिसांच्या स्वाधीन केले.